# कृषी विद्यापीठ विभाजनाला मिळाला बजेटचा मुहूर्त

**विनोद इंगोले**

नागपूर : होणार होणार अशी गेली अनेक वर्षे चर्चा असलेल्या अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या विभाजनाचा मुद्दा राज्याच्या अर्थसंकल्पात निकाली निघणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून सांगण्यात आले. नव्या विद्यापीठाकरीता सुमारे ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचेही सांगितले जाते.

अकोला मुख्यालय असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात पूर्व व पश्चिम विदर्भातील ११ जिल्ह्यांचा समावेश होतो. पश्चिम विदर्भात कपाशी, सोयाबीन, तूर, मूग, उडीद यासारखी पीकपद्धती आहे. पश्चिम विदर्भात असलेल्या विद्यापीठाकडून त्याच भागातील शेतकऱ्यांना अद्याप संशोधनात्मक उपलब्धीच्या नावावर काही ठोस मिळाले नाही. पश्चिम विदर्भातील शेतकरीच अशा प्रकारे उपेक्षित असताना पूर्व विदर्भाचा तर विषयच होत नाही, अशी अवस्था आहे.

पूर्व विदर्भातील चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, नागपूर या जिल्ह्यांत भात लागवड होते. या शेतकऱ्यांना तर कृषी विद्यापीठ म्हणजे दुरुन डोंगर साजरे या पठडीतील ठरले आहे. त्यामुळे भात उत्पादक शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठाचा मुद्दा ऐरणीवर आला. खुद्द अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार त्यासाठी आग्रही होते. मुख्यमंत्र्यांचे आजोळ, तर अर्थमंत्र्यांचे गाव असलेल्या मुल येथे हे विद्यापीठ प्रस्तावीत करण्यात आले. कृषी तंत्रज्ञान आणि वानिकी विद्यापीठ (ॲग्री टेक्नॉलॉजी व फॉरेस्ट्री) असे हे विद्यापीठ राहणार असल्याचे सूतोवाच आहेत.

**डॉ. व्यंकटेश्वरलू कमिटीने दिला अहवाल**

कृषी विद्यापीठाच्या विभाजनाकरीता परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्यंकटेश्वरलू यांच्या अध्यक्षतेत दीड वर्षापूर्वी समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने आपला मराठी, इंग्रजी भाषेतील अहवाल सरकारला दिला. या अहवालात कृषी विद्यापीठ स्थापनेनंतर होणारा महिन्याचा खर्च दिला गेला आहे. त्यासोबतच पदाबाबतचा आढावाही घेण्यात आला आहे.

> **कृषी विद्यापीठ विभाजन आमच्या अजेंड्यावर आहे. राज्यपाल कार्यालयाकडून या संदर्भाने काही हरकती उपस्थित करण्यात आल्या आहेत. त्या हरकतींचे समाधान झाल्यानंतर हा विषय मार्गी लागेल.**
>
> – **सुधीर मुनगंटीवार**, अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य

# विरोधकांच्या इशाऱ्यानंतर तूर खरेदीच्या मर्यादेत वाढ



**मुंबई (प्रतिनिधी) :** विरोधकांच्या आक्रमक इशाऱ्यानंतर राज्य सरकारने तूर खरेदीची एकरी मर्यादा वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. तूर खरेदीची सध्याची एकरी मर्यादा कमी असल्याने शेतकऱ्यांना तूर विक्रीसाठी अडचण येत आहे. ही अडचण दूर करण्यासाठी तूर खरेदीची एकरी मर्यादा वाढविण्यात आल्याचे पणनमंत्री सुभाष देशमुख यांनी सांगितले.

राज्यात तूर उत्पादक शेतकऱ्यांना एकरी सरासरी ८ ते १० क्विंटल उत्पादन झाले असताना सरकारने तूर खरेदीबाबत एकरी मर्यादा घालणारे परिपत्रक जारी केले होते. त्यावरून 'उरलेल्या तुरीचे पीठ करून पकोडे तळायचे का,' अशी संतप्त विचारणा विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी राज्य सरकारला केली होती. या परिपत्रकानुसार खरेदी झाली तर अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्याच्या एकूण उत्पादनाच्या एकतृतीयांश तूरदेखील हमीभावाने खरेदी होणार नसल्याचे सांगत या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांनाही पत्र दिले होते. सरकारने शासकीय तूर खरेदीसाठी घातलेली जिल्हानिहाय एकरी मर्यादा शेतकरीविरोधी असून, या संदर्भातील परिपत्रक तातडीने मागे घेतले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली होती. त्यावरून गोंधळ होत असल्याचे निदर्शनाला येताच सरकारने हा निर्णय मागे घेतल्याचे स्पष्ट केले आहे.



### पेरणी क्षेत्र १०० टक्के ग्राह्य धरणार

"राज्यभरात १६० केंद्रांवर हमीभावाने तूर खरेदी १ फेब्रुवारीपासून सुरू झाली आहे. तूर हे आंतरपीक असल्यामुळे किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत तूर खरेदीसाठी आतापर्यंत उत्पादकता ठरविण्यासाठी तूर पेऱ्याखाली असलेल्या क्षेत्राच्या २० टक्के क्षेत्र ग्राह्य धरण्यात येत होते. ते क्षेत्र आता १०० टक्के ग्राह्य धरण्यात येईल. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तूर हे आंतरपीक असले तरी लागवडीखालील क्षेत्र मोजताना १०० टक्के क्षेत्र हे तूर लागवडीखाली असल्याचे ग्राह्य धरण्याबाबत सहमती झाली. यामुळे शासनाला शेतकऱ्यांकडून सध्या असलेल्या निकषांपेक्षा जास्त तूर हमीभावाने खरेदी करता येईल. तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना याचा निश्चित लाभ होईल," असे मंत्री श्री. देशमुख यांनी सांगितले.

# करांमुळे कापूस उद्योग अडचणीत

**जळगाव (प्रतिनिधी) :** यंदा गुलाबी बोंडअळीचा फटका कापूस उत्पादकांना बसल्याने उत्पादनात ४० ते ५० लाख गाठींची (एक गाठ १७० किलो रुई) घट निश्चित होणार आहे. यातच वस्तू व सेवाकर, रिव्हर्स कॅल्क्युलेशन मॅकेनिझम (आरसीएम) व मार्केट सेसमुळे कापूस प्रक्रिया उद्योगाला फटका बसत असून, बाहेरच्या देशातील खरेदीदारांकडून प्रतिसाद कमी होत आहे. निर्यातीवर परिणाम झाला असून, करांची समस्या सोडविण्यासह खासगी कापड उद्योग आणि जिनिंग उद्योगाला विजेच्या दरात युनिटमागे दोन रुपये सवलत मिळण्यासंबंधी केंद्र सरकारला साकडे घातले जाईल, असा निर्धार कॉटन असोसिएशनच्या बैठकीत करण्यात आला.

मुंबई येथील कॉटन ग्रीन रेल्वे स्टेशननजीकच्या कॉटन बिल्डिंगमध्ये नुकतीच ही बैठक झाली. त्यात असोसिएशनचे अध्यक्ष अतुल गणात्रा, सदस्य अनिल सोमाणी (जळगाव), गोपाल अग्रवाल आदी सहभागी झाले.

ऑक्टोबरमध्ये कापूस बाजार ७० सेंटवर आला होता. तो डिसेंबरमध्ये ८४ सेंटवर पोचला. आजघडीला हाच बाजार ७६ सेंटवर आला असून, रूई, सूत, कापड उद्योग वित्तीय संकटातून जात आहे. वस्तू व सेवाकरातील आरसीएम प्रणालीमुळे कापूस उद्योगातील व्हॅल्यू चेन बाधीत झाली आहे. बाहेरच्या देशातील खरेदीदारांना भारतीय कापड, सूत किंवा रूई बांगलादेश, पाकिस्तानच्या तुलनेत महागात पडत असल्याने निर्यातीवर परिणाम झाला आहे. सरकारने रूई, सुताच्या निर्यातीवरील प्रत्येकी दीड व तीन टक्के अनुदान (इन्सेटिव्ह) रद्द केले आहे. दुसऱ्या बाजूला कापूस खरेदीदारांना एक टक्के मार्केट सेस द्यावा लागतो. सहकारी संस्थांना विजेच्या दरात जशी सूट दिली आहे, तशी सूट जिनर्स व खासगी कापड उद्योगांना दिली जावी. जिनर्सना कापूस खरेदी करताना पाच टक्के वस्तू व सेवाकर द्यावा लागतो. सहा, सहा महिने परतावा (रिफंड) मिळत नाही.

## अर्थसंकल्पी अधिवेशन २६ फेब्रुवारीपासून

**मुंबई (प्रतिनिधी):** राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पी अधिवेशन येत्या २६ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. २८ मार्चपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात ९ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे.

येत्या मे-जूनमध्ये कर्नाटकमध्ये विधानसभेची निवडणूक होत आहे. या निवडणुकीतील निकालावरून देशाच्या आगामी राजकारणाची दिशा स्पष्ट होईल असे बोलले जाते. वाऱ्याची दिशा खूपच विरोधात जात असल्याचे लक्षात येताच आगामी मध्य प्रदेश, राजस्थान विधानसभा निवडणुकांसोबत डिसेंबरअखेर लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका घेतल्या जातील असा अंदाज आहे. त्यापार्श्वभूमीवर केंद्र सरकारनेही अर्थसंकल्पात ग्रामीण भारत आणि कृषी क्षेत्राला झुकते माप देण्याचा प्रयत्न केला. भाजप हा शहरी तोंडवळ्याचा पक्ष असल्याची टीका होते, ही प्रतिमा पुसून ग्रामीण भागातील नागरिकांना कुरवाळण्याचा भाजपचा प्रयत्न आहे, त्यामुळे केंद्राच्या अर्थसंकल्पाचे प्रतिबिंब राज्याच्या अर्थसंकल्पातही उमटण्याची शक्यता व्यक्त होत आहे.


सकाळ ॲग्रोवन — आयोजित
AJAY BIO-TECH (INDIA) LTD. — प्रायोजित

ॲग्रोवन संवाद

'ॲग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद

कार्यक्रम वेळापत्रक

**शनिवार, १० फेब्रुवारी २०१८**

विषय – भाजीपाला पिक किड व्यवस्थापन

वक्ते – डॉ. उषा डोंगरवार (केव्हीके, समन्वयक, साकोली)

श्री. गणेश गोरे (अजय बायोटेक)

स्थळ– जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बोरगांव, ता. लाखनी, जि. भंडारा

वेळ – दुपारी १२ वाजता

या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.



तंदुरुस्त राहा, देखणे दिसा

फक्त 1 कॅप्सूल सकाळी आणि 1 संध्याकाळी घ्या

जॉली फॅट-गोमध्ये आहे एक प्रभावी, अत्याधुनिक आणि आयुर्वेदिक फॉर्म्युला जो बनविला आहे ग्रीन टी, पायनापल, गार्सिनिया कॅम्बोजियासारख्या 15 उत्कृष्ट जडी-बुटींपासून ! साईड इफेक्ट नाही, जॉली फॅट-गो महिला आणि पुरुष दोघांसाठीही अत्यंत प्रभावी आहे.




अधिक चांगला गुण येण्यासाठी 'जॉली फॅट-गो' पावडर, एक ग्लास स्कीम्ड मिल्कमध्ये मिसळा, चांगल्याप्रकारे हलवा आणि हे पेय जेवणाऐवजी घ्या. शरीरावरील ताणलेल्या सुरकुत्या आणि पोट व मांड्यांवरील चरबीच्या लोंबणाऱ्या वळ्या घालवण्यासाठी रात्री झोपण्यापूर्वी 'जॉली फॅट-गो ऑईल'ने चांगला मसाज करा.

जॉली फॅट-गो कोणतेही दोन बॉक्सेस खरेदी करा आणि एक जॉली ऑर्गेनिक ग्रीन टी मोफत प्राप्त करा. (किंमत ₹ 177/-) मोफत




JOLLY FAT-GO

स्लिमिंग कॅप्सूल्स, पावडर आणि तेल

सर्व अग्रगण्य मेडिकल स्टोअर्समध्ये उपलब्ध | Helpline: 78143-66633